# महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित

## (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## वार्षिक अहवाल

## २०१०–११

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल पोरवाल | ... | अध्यक्ष |
| श्री. सिताराम कुंटे | ... | संचालक |
| श्री. ए. डी. जोशी | ... | संचालक |
| श्री. व्ही. एम. कुलकर्णी | ... | संचालक |
| श्री. एस. एम. उपासे | ... | संचालक |

लेखापरीक्षक —

मे. भुचर अँड चांडक
सनदी लेखापाल
१/ए, सिल्व्हरलाईन,
एस. बी. मार्ग, जे. बी. नगर
अंधेरी (पूर्व)
मुंबई — ४०० ०५९

नोंदणीकृत कार्यालय —

सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क
बिल्डींग क्र. ४,
अंधेरी–घाटकोपर लिंक रोड
अंधेरी (पूर्व)
मुंबई — ४०० ०९३

# महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित
# (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय — सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, बिल्डींग क्र. ४,
अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई — ४०० ०९३
दूरध्वनी — ६६५७२७०० फॅक्स — २८३९१८५७
सीआयएन क्र. — यु६५९२०एमएच१९९६एसजीसी१०२२७३

---

भागधारकांना नोटीस

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित यांच्या भागधारकांची वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात शुक्रवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०११ रोजी दुपारी २.३० वाजता पुढील कामकाज करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे.

**सर्वसाधारण कामकाज —**

१. दिनांक ३१ मार्च २०११ रोजीचा ताळेबंद आणि त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा-तोटयाचा हिशेब व त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल, संचालकांचा अहवाल प्राप्त करणे आणि तो स्वीकृत करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

संचालक
महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित

दिनांक — २५ ऑगस्ट, २०११
स्थळ — मुंबई

टीप — सभेस हजर राहण्यास व मतदानाचा हक्क असणारा सदस्य सभेस हजर राहण्यासाठी व मतदान करण्यासाठी स्वत: ऐवजी बदली व्यक्तीची नियुक्ती करु शकतो व अशी व्यक्ती कंपनीची भागधारक असणे आवश्यक नाही. बदली व्यक्ती संबंधीची माहिती सभेपूर्वी ४८ तास अगोदर कंपनीस कळविणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित

## (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय — सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, बिल्डींग क्र. ४,
अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई — ४०० ०९३
दूरध्वनी — ६६५७२७०० फॅक्स — २८३९१८५७
सीआयएन क्र. — यु६५९२०एमएच१९९६एसजीसी१०२२७३

---

**भागधारकांना नोटीस**

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित यांच्या भागधारकांची पुढे ढकलण्यात आलेली वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता पुढील सर्वसाधारण कामकाज करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे.

**सर्वसाधारण कामकाज —**

१. दिनांक ३१ मार्च २०११ रोजीचा ताळेबंद आणि त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा-तोटयाचा हिशेब व त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल, भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अभिप्राय व संचालकांचा अहवाल प्राप्त करणे आणि तो स्वीकृत करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

संचालक
महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित

दिनांक — २० जानेवारी, २०१६
स्थळ — मुंबई

टीप — सभेस हजर राहण्यास व मतदानाचा हक्क असणारा सदस्य सभेस हजर राहण्यासाठी व मतदान करण्यासाठी स्वत: ऐवजी बदली व्यक्तीची नियुक्ती करु शकतो व अशी व्यक्ती कंपनीची भागधारक असणे आवश्यक नाही. बदली व्यक्ती संबंधीची माहिती सभेपूर्वी ४८ तास अगोदर कंपनीस कळविणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित

## (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय — सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, बिल्डींग क्र. ४,
अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई — ४०० ०९३
दूरध्वनी — ६६५७२७०० फॅक्स — २८३९१८५७
सीआयएन क्र. — यु६५९२०एमएच१९९६एसजीसी१०२२७३

---

संचालकांचा अहवाल

प्रति,
सदस्य

आपल्या संचालकांना दिनांक ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षाकरीता आपल्या कंपनीच्या लेखापरीक्षीत लेख्यांसह पंधरावा वार्षिक अहवाल सादर करण्यास आनंद होत आहे.

**वित्तविषयक ठळक वैशिष्टये**

(रुपये लाखवात)

| **तपशील** | **२०१०-११** | **२००९-१०** |
|---|---|---|
| उत्पन्न | ८०४४.९७ | ८५७७.७४ |
| खर्च | ८०४४.९७ | ८५७७.७४ |
| करपूर्व नफा | निरंक | निरंक |
| वजा — करासाठी तरतूद | -- | -- |
| वर्षाचा निव्वळ नफा/(तोटा) | -- | -- |

लाभांश —

पुनर्विलोकन चालू असलेल्या वर्षाकरीता सममूल्य भाग भांडवलावर कोणताही लाभांश देण्याची आपल्या संचालकांची शिफारस नाही.

**कामगिरी —**

पुनर्विलोकनाच्या वर्षात, आपल्या कंपनीने रु.८०४४.९७ लाख निव्वळ उत्पन्नाची (मागील वर्षी रु.८५७७.७४) आणि शून्य नफ्याची (मागील वर्षी शून्य नफा) नोंद केलेली आहे. कंपनीने चालू वित्तीय वर्षात करासाठी कोणत्याही रकमेची तरतूद केलेली नाही. आयसीएआयने निर्गमीत केलेल्या उत्पन्नावरील करांचे एएस २२ अनुसार कंपनीने शुन्य रकमेएवढ्या एकत्रित करास

मान्यता दिलेली आहे. करपश्चात निव्वळ तोटा रु.०.५५ लाख (मागील वर्षी शून्य) इतका दाखविण्यात आला आहे.

**लेखपरिक्षकांच्या अभिप्रायांना उत्तरे —**

**<u>लेखपरिक्षकांचा अहवाल परिच्छेद २ अ</u>**

(१) कंपनी विशिष्ट उद्देशाने स्थापन झालेली आहे. कंपनीच्या स्थापनेपासून सिकॉम तीचे व्यवस्थापन पहात आहे, म्हणून याबाबतीत सिकॉम लिमिटेडशी चर्चा करण्यात येईल. पुढे असे नमूद करण्यात येत आहे की, कंपनीचे संचालक लेखापरिक्षकांना भेटण्यास तयार आहेत आणि लेखापरिक्षकांची कुठली विनंती अमान्य करण्यात आलेली नाही. परंतु दोघांच्या सोयीची तारीख ठरविण्यात आलेली नसल्यामुळे, अशी सभा होऊ शकली नाही.

**<u>लेखपरिक्षकांचा अहवाल परिच्छेद २ फ</u>**

(१) कंपनीच्या सर्व कर्जरोखे धारकांना शिलकी निराकरणाबाबत कन्फरमेशनची पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. परंतु त्यावरील उत्तरे ही कर्जरोखे धारकांकडून अपेक्षित आहेत आणि सिकॉम/ एमपीव्हीसीएल नाही.

(२) सर्व ३३ कर्जरोखे धारकांचे पैसे पूर्णपणे परत करण्यात आलेले आहेत व आज रोजी त्यांना देय असलेली कुठलीही रक्कम बाकी नाही.

(३) कर्जरोख्यांच्या व्यवस्थापनासाठी बाहेरील एजन्सी नियुक्त करण्यात आलेली होती आणि कंपनीकडे कोणत्याही कर्जरोखे धारकांकडून कुठलीही तक्रार आलेली नाही. नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीकडून स्टेटमेंट देण्यात आले होते, सदर स्टेटमेंट लेखपरिक्षकांना देण्यात आले होते, जे ३ महिन्यांपर्यंत व्हॅलीड होते.

**<u>लेखपरिक्षकांचा अहवाल परिच्छेद २ ग</u>**

(१) दिनांक ३१/०३/२०११ रोजी रु. ११३.२३ लाख एवढी रक्कम पुट अँड कॉल याखाली मध्ये होती, त्यापैकी रु. १००.७४ लाख एवढी रक्कम परत करण्यात आली आहे. बाकी रु. १२.४९ लाख सिकॉमकडे दैनंदिन खर्चाकरीता ठेवण्यात आले आहेत. यामुळे संचालक मंडळाच्या आणि लेखापरिक्षकांच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन झालेले नाही. पुढे असे नमूद करावेसे वाटते की आस्थापनांकडे ठेवण्यात आलेल्या रकमेबाबतची सद्यस्थिती संचालक मंडळाला वेळोवेळी देण्यात येत असते व तीचा संचालक मंडळ साकल्याने विचार करीत असते.

(२) यामध्ये जी रक्कम लेखापरिक्षकांनी विचारात घेतलेली आहे ती त्या दिवसाची आहे व ती संबंध कालावधीसाठीची नाही. सदर सिकॉमकडे ठेवण्यात आलेली रक्कम ही राज्य शासनाने कंपनीला दैनंदिन कामकाजासाठी, ज्यामध्ये कर्जरोखेधारकांना देण्यात येणारी मूळ रक्कम व त्यावरील व्याज यांचा समावेश आहे, कंपनीला अदा केलेली रक्कम आहे.

सदर रक्कम सिकॉमकडे "गरजेनुसार घेण्यात येईल" या तत्वावर ठेवण्यात आलेली आहे आणि त्यावर सिकॉमकडून कमी दराने व्याज देण्यात येते. जर सदर रक्कम बँकेमध्ये चालू खात्यात ठेवली असती तर त्यावर कुठलेही व्याज मिळाले नसते.

यावरुन असे दिसते की लेखापरिक्षकांनी आपल्या अहवालामध्ये वित्तीय तोटा याखाली जो रिमार्क दिलेला आहे त्याला कुठलाही आधार नाही.

येथे असे नमूद करावेसे वाटते की रु. २५ लाख ही रक्कम राज्य शासनाने कर्जरोखे व त्यावरील व्याज परत करण्यासाठी दिलेल्या रकमेपेक्षा निराळी आहे. संचालक मंडळ आपल्या प्रत्येक बैठकीमध्ये आस्थापनांमध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवींच्या रकमेवर उहापोह करुन निर्णय घेत असते. पुढे असेही नमूद करण्यात येत आहे की, रु. २५ लाख ही रक्कम सरकारमान्य हिशेब तपासनीसांनी संचालक मंडळच्या दिनांक ९ जुलै २००९ व ३१ मार्च २०१० रोजी झालेल्या सभांमध्ये मांडण्यात आलेली होती व सदर रकमेला दिनांक २७ डिसेंबर २०१० रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मान्यता देण्यात आली.

(३) कमी व्याज दराबाबतचा मुद्दा सिकॉमकडे उपस्थित करण्यात आला आहे. परंतु सिकॉमचा व्याजदर हा कंपनीने सिकॉमकडे ठेवलेल्या रकमेवर ठरविण्यात आलेला आहे, व्याजदर ठरविताना मुदतीचा विचार करण्यात आलेला नाही, तसेच जर मुदतीआधी रक्कम काढून घेण्यात आली तर सिकॉम त्यावर कुठल्याही प्रकारची पेनल्टी आकारत नाही. सिकॉमकडून असे कळविण्यात आले की कंपनीने सिकॉमकडे ठेवलेल्या रक्कम ही मुदतबंद नसल्यामुळे व्याजदर वाढविता येत नाहीत. त्यामुळे व्याजाच्या रकमेमध्ये कोणत्याही रकमेचा तोटा कंपनीला होत नाही, त्यामुळे राज्य सरकारला कोणत्याही प्रकारचा तोटा सोसावा लागत नाही.

(४) लेखापरिक्षकांनी गुंतवणूक समिती स्थापण्याच्या संचालक मंडळाने केलेल्या सूचनेवर असे नमूद करण्यात येत आहे की अहवाल वर्षाच्या सुरवातीला रु. ६९९.१७ कोटीचे कर्जरोखे होते. अहवाल वर्षात रु. १ कोटींचे कर्जरोखे परत करण्यात आले व वर्षाअखेरीस रु. ६९०.१३ कोटीचे कर्जरोखे बाकी आहेत. दिनांक १५ जुलै २०१० रोजी देय असलेल्या व्याजाची रक्कम व कर्जरोखे परतफेडीची रक्कम ही राज्य शासनाने देय दिनांकाच्यापूर्वी उपलब्ध करुन दिलेली आहे. ही कंपनी कर्जरोखे व्यवस्थापनाच्या विशिष्ट उद्देशाने आणि पाटबंधारे महामंडळांना वित्त उपलब्ध करुन देण्याकरीता स्थापन झालेली आहे.

**<u>लेखापरिक्षकांचा अहवाल परिच्छेद २ ह</u>**

१. राज्य शासनाने पाटबंधारे महामंडळांच्या पाटबंधारे प्रकल्पांकरीता बहुपक्षीय करारांची अंमलबजावणी वित्त उभे करण्याकरीता केली आहे. कंपनी पाच पाटबंधारे महामंडळांना निधी उपलब्ध करुन देते. कंपनीने दिलेल्या कर्जाची व त्यावरील व्याजाची परतफेड करण्याची हमी महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे. त्यामुळे शासनाकडून परतफेड

झाल्यावर कंपनीच्या पुस्तकांमधील पाटबंधारे महामंडळांच्या दायित्वांची प्रतीपूर्ती करण्यासाठी, तसेच कर्जरोखे धारकांचे पैसे परत करण्यासाठी, त्यावरील व्याज देण्यासाठी व कंपनीच्या दैनंदिन कामकाजासाठी राज्य शासन कंपनीला वित्त पुरवठा करील. याकरीता कंपनी, राज्य शासन व पाच पाटबंधारे महामंडळे यांच्यामध्ये बहुपक्षीय करार करण्यात येणार आहे. असा बहुपक्षीय करार करण्याचे कामकाज चालू आहे.

**लेखापरिक्षकांचा अहवाल परिच्छेद २ आय**

कंपनीला कंपनी निबंधकांकडून विवरण पत्रांची प्रतिक्षा आहे. ते मिळाल्यावर लेखापरिक्षकांकडे पाठविण्यात येतील.

**लेखापरिक्षकांचा अहवाल परिच्छेद २ जे**

शासकीय निर्णयाची प्रत कंपनीकडे आहे. बैठकीच्या कार्यवृत्तांताचा मसुदा लेखापरिक्षांकाना सादर करण्यात आला होता. पुढच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सदर कार्यवृत्तांत संमत होईल.

**लेखापरिक्षक —**

भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी भुचर आणि चांडक, सनदी लेखापाल यांची सन २०१०–११ करीता कंपनीचे सांविधिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

**संचालक —**

पुनर्विलोकन वर्षामध्ये श्री. व्ही. आर. वेदपाठक यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पदावर श्री. एच. व्ही. मालंडकर यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्री. बी. एन. कांदरफळे आणि श्री. व्ही. के. अग्रवाल यांच्या झालेल्या बदलीमुळे त्यांच्या जागी श्री. डी. डी. भिडे व श्री. सुनिल सोनी यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. नंतर श्री. डी. डी. भिडे यांच्या झालेल्या बदलीमुळे त्यांच्या जागी श्री. डी. एन. मोडक यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**सार्वजनिक नियत ठेवी —**

कंपनी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे सार्वजनिक ठेवी न स्वीकारणारी अधिकोषणेतर (नॉन बँकींग) वित्तीय कंपनी म्हणून नोंदणीकृत असल्यामुळे जनतेकडून कोणत्याही नियत ठेवी स्वीकारण्यासाठी पात्र नाही.

**संचालकांच्या जबाबदारी संबंधीतील निवेदन —**

१. वार्षिक लेखा तयार करताना लागू असलेली लेखांकन मानके अनुसरण्यात आली आहे आणि त्यामध्ये कोणताही महत्वपूर्ण फरक नाही.
२. निवडक लेखांकन धोरणे सातत्याने राबविली जात होती आणि दिनांक ३१ मार्च २०११ रोजी कंपनीच्या असलेल्या कामकाजाचे खरेखुरे व उचित अवलोकन करुन देण्याच्या दृष्टीने आणि दिनांकास संपलेल्या वर्षात कंपनीच्या नफ्याबाबत संचालकांनी दिलेले अभिप्राय आणि केलेले अंदाज संयुक्तीक व दूरदर्शी आहेत.

३. कंपनीच्या मतांचे संरक्षण करण्यासाठी आणि अफरातफर व इतर नियमबाह्य गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी व त्या शोधून काढण्यासाठी, कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीनुसार लेखांकन अभिलेख्यांचे योग्य ते परिरक्षण करण्याकरिता यथोचित व पुरेशी काळजी घेण्यात आली आहे.
४. हे वार्षिक लेखे चालू असलेलया व्यवसाय संस्थेच्या माहितीच्या अधारे तयार करण्यात आले आहेत.

**अभिस्वीकृती —**

आपली कंपनी शासनाची हमी व परतफेडीची बंधने स्वीकारुन आवश्यक ते अर्थसंकल्पीय सहाय्य यासह रोखे उभारण्याचे काम सोपविल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची आभारी आहे. रोख्यांची विक्री करण्यासाठी नियुक्त केलेले विविध मध्यस्थ, लेखापरीक्षक, बँक व्यवसायी यांनी अमूल्य व प्रभावी सेवा दिल्याबद्दल संचालक त्यांचेही आभार मानत आहे.

संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने,

संचालक संचालक

ठिकाण — मुंबई
दिनांक — ०१/०७/२०१५

भुचर आणि चांडक
सनदी लेखापाल

ए–४, ॲग्नेलिका, प्राईड पार्क,
घोडबंदर रोड,
ठाणे (प) — ४०० ६०७
दूरध्वनी — २५८९६७६२
ईमेल —

लेखपरिक्षकांचा अहवाल

सदस्य,
महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित

आम्ही महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित कंपनीचा दिनांक ३१ मार्च २०११ रोजीचा जोडलेला ताळेबंद आणि त्याला जोडलेले त्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीचा नफा तोटा पत्रक आणि रोख रकमेचे विवरणपत्र यांची लोखापरीक्षा केली. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापनाची आहे. या वित्तीय विवरणपत्रांवर आमच्या लेखापरीक्षणानुसार मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.
आम्ही भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या लेखापरीक्षा मानकांनुसार ही लेखापरीक्षा केली आहे. वित्तीय विवरणपत्रांमध्ये चुकीची माहिती दिलेली नाही याची योग्य ती हमी मिळविण्याच्या दृष्टीने आम्ही लेखापरीक्षेत उपाययोजना करणे व ती पूर्ण करणे आवश्यक असते. लेखापरीक्षेमध्ये, वित्तीय विवरणपत्रांमधील रकमा व प्रकटीकरणे यांना आधारभूत असलेल्या पुराव्यांचे चाचणीदाखल परीक्षण करणे अंतर्भूत आहे. लेखापरीक्षेत व्यवस्थापनाने वापरलेली लेखांकन तत्वे व ठळक अंदाज निर्धारीत करणे तसेच सादर केलेल्या संपूर्ण वित्तीय विवरणपत्रांचे मूल्यमापन करणे यांचा देखील अंतर्भाव आहे. आमच्या लेखापरीक्षेमुळे आमच्या मताला अधिष्टान मिळते याचा आम्हास विश्वास वाटतो.
आमचा अहवाल पुढीलप्रमाणे —

१. कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २२७(४ए) अनुसार कंपनी कायदा मंडळाने काढलेल्या, कंपन्या (लेखापरीखक्षकाचा अहवाल आदेश २००३ याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे आम्ही कंपनीला ज्या मर्यादेपर्यंत उक्त आदेशाच्या परिच्छेद ४ आणि ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी लागू असतील, त्या बाबींवरील एक विवरणपत्र यासोबत जोडले आहे.
२. वर उल्लेखिलेल्या आमच्या अहवालामधील प्रपत्रानुसार आम्ही लक्ष वेधू इच्छितो की वरील विवरण पत्रात उल्लेख केल्याच्या अनुषंगाने आमचे भाष्य असे आहे की —

अ) या कंपनीचे लेखापरिक्षण २८/०४/२०१४ रोजी करण्यात आले. मागील वर्षी आम्ही कंपनीच्या अध्यक्षांशी सल्लामसलत करु शकलो नसल्यामुळे पुढील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे —

१) लेखापरिक्षणामध्ये निर्दिष्ट केलेले मुद्दे

२) कंपनीचे व्यवस्थापन सिकॉम लिमिटेड करते व त्याबाबतच्या काही मुद्दयांवर लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे आम्हाला संचालक मंडळाने नेमलेल्या बाह्य एजन्सीशी कंपनीच्या काही संवेदनशील मुद्दयांवर सल्लामसलत करणे आवश्यक वाटले.

३) आमची सल्लामसलत ही सिकॉमच्या अधिकाऱ्यांशी व कंपनीबरोबर केलेल्या पत्रव्यवहारांपुरती मर्यादित आहे. या मर्यादेत राहून आम्हाला कंपनीकडून लेखापरिक्षणासाठी लागणारी माहिती व विवरणे संपूर्णरित्या मिळालेली नाहीत.

ब) आमच्या मते, कंपनीच्या लेखा पुस्तकांच्या आम्ही केलेल्या परीक्षणावरुन असे दिसून येते की, कंपनीने कायद्याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यथायोग्य लेखापुस्तके ठेवलेली आहेत.

क) या अहवालाशी संबंधित असलेला ताळेबंद व नफा तोटयाचा हिशेब आणि रोख रकमेचे विवरणपत्र हे कंपनीच्या लेखापुस्तकांशी जुळणारे आहे.

ड) या अहवालात परामर्श घेतलेला ताळेबंद, नफा-तोटयाचा हिशेब आणि रोख रकमेचे विवरणपत्र हे कंपनी अधिनियम, १९५६ चे कलम २११(३सी) त्यांना लागू असेल तेथवर, त्यात निर्दिष्ट केलेल्या लेखांकन मापकांना अनुसरुन आहेत.

इ) संचालक निरर्हतेसंबंधात, कंपनी कार्य विभाग, वित्त मंत्रालयाने काढलेली अधिसूचना जी.एस.आर. ८२९ (इ) व कंपनी अधिनियम, १९५६ चे कलम २७४(१)(जी) जे शासकीय कंपनीला लागू नाही.

फ) दिनांक ३१/३/२०११ रोजी रोखे धारकांकडून घेतलेली रु. ६९,०१,३००,००० ची सिक्युअर्ड कर्जे आहेत. याची संमतीपत्रे रोखे धारकांकडून मागीतलेली आहेत. यावर आम्ही सांगू इच्छितो की —

१. ३३ रोखे धारकांचे पत्ते, ज्यांनी रु. ४८२,००,००० एवढी रक्कम दिलेली आहे, कंपनीकडे नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून संमती पत्रे मिळणार नाही.

२. आम्हाला असे सांगण्यात आले की, ३२३ रोखे धारक, ज्यांनी रु. ३९६,४१,००,००० (५७.४४ टक्के) एवढी रक्कम दिलेली आहे, त्यांनी कंपनीच्या विनंतीला कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यांना संमतीपत्रांसाठी केलेल्या पत्रव्यवहाराचा कुठलाही पुरावा आम्हाला दिलेला नाही.

त्यामुळे सदर ३२३ रोखे धारक ज्यांनी रु. ३९६,४१,००,००० एवढी रक्कम दिलेली आहे त्यांचे बहि:शाल कन्फर्मेशन करु शकलो नाही.

ग) आम्ही नमूद करु इच्छितो की मागील वर्षी अधिक (सरप्लस) असलेला फंड कंपनीने सिकॉमकडे ठेव म्हणून ठेवला होता, तो १/४/२०१० रोजी रु. ६८४.५८ लाख एवढा होता व दिनांक ३१/३/२०११ रोजी रु.११३.२३ लाख एवढा शिल्लक आहे. ह्या ठेवी संचालक मंडळाने

(दिनांक ९/७/२००९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये व दिनांक ३१/३/२०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये परत निर्दिष्ट केल्याप्रमाणे) निर्दिष्ट केल्याप्रमाणे जास्तीत जास्त रु.२५ एवढी रक्कम ठेवणे आवश्यक आहे व उरलेली रक्कम इतर एजन्सिकडे/ वित्तीय संस्थांकडे अधिक चांगल्या अटींवर आणि जास्त व्याजदराने ठेवण्यात यावी, या सूचनेचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. या ठेवी सध्या बँकांमध्ये नियत ठेवींवर मिळणाऱ्या व्याज दरापेक्षा अतिशय कमी दराने ठेवण्यात आलेल्या आहेत. यांचा व्याजदर १ टक्का / २ टक्का इतका कमी आहे. लेखा परिक्षणाचे वेळी ठेवींचे सर्टिफिकेट दाखविण्यात आले नाही. यावेळी कुठल्याही प्रकारचे इतर ठेवींचे तुलनात्मक पृथ्थकरण दाखविण्यात आले नाही. आमच्या मते सिकॉम लिमिटेडने सदर रक्कम ही त्यांच्या उपयोगासाठी कमी व्याजदराने वापरली व त्यामुळे संचालक मंडळाने दिलेल्या सूचनांचे उल्लंघन झालेले आहे व कंपनीला मिळणारी व्याजाची रक्कम कमी प्रमाणात मिळाली. संचालक मंडळाने दिनांक २७/१२/२०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये या ठेवींना पश्चात मान्यता देण्यात आली आणि या ठेवींचे सर्टिफिकेट सादर करण्यात आले. तरीसुध्दा कंपनीला झालेला वित्तीय तोटा आणि संचालकांच्या सूचनेचे झालेले उल्लंघन याचे स्पष्टीकरण यामुळे होत नाही. जमेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाची राज्य शासनाने अधिक वित्तीय पुरवठा करुन मिळवणी केली, त्यामुळे अंततः राज्य शासनाचा तोटा झाला.

आमच्या मते अशा प्रकारे बाहेरील एजन्सिला कंपनीचे निधी वापरावयास देणे, यामध्ये सुधारणा व्हावयास हवी. यावर आमचे असे मत आहे की गुंतवणूकींवर लक्ष ठेवणारी कंपनी अंतर्गत कार्ययंत्रणा कमकुवत आहे. संचालकांची एक गुंतवणूक उप-समिती स्थापण्याची आवश्यकता आहे आणि संचालक मंडळाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची आवश्यकता आहे.

ह) कंपनी, पाटबंधारे महामंडळे आणि राज्य शासन यांच्यामध्ये पाटबंधारे महामंडळांना देण्यात आलेल्या अग्रिम रकमेबाबत होणाऱ्या बहुपक्षीय करारास अजून पूर्णत्व आलेले नाही. सदर कराराच्या शर्ती आणि अटी ठरविल्या गेल्या नसल्यामुळे पाटबंधारे महामंडळांकडून मिळणाऱ्या व्याजाची रक्कम ठरविता आलेली नाही (अनुसूची १३ नोट क्र. २(अ)

(आय) कंपनी रजिस्ट्रारकडे सादर करण्यात आलेल्या, आधीच्या वर्षी वितरीत केलेल्या कर्जरोख्यांचे फॉर्म ८ आणि १३ आमच्या लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात आले नाहीत.

(जे) वित्तीय खर्चामध्ये (अनुसूची ११) हमी फी रु.११,६४,०६,०००/- (मागील वर्षी रु. १६,५७,८१,०००/-) जी (अनुसूची ८) चालू निधीमध्ये सुध्दा दाखविण्यात आली आहे. संचालक मंडळाने त्यांच्या ३०/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेमध्ये राज्य शासनाला देय असलेली हमी फी करीता केलेली तरतूद मान्य केली आहे. आम्हाला असे सांगण्यात आले की सदर हमी फी राज्य शासनानेही (नियोजन विभाग) मान्य केलेली आहे. परंतु सदर हमी फी ठरविण्यासंबंधीचे स्पष्टीकरण अथवा त्याबाबतची आवश्यक कागदपत्रे आम्हाला लेखापरिक्षणासाठी दाखविण्यात आली नाहीत. त्यामुळे त्याची सत्यता आम्ही देऊ शकत नाही.

आमच्या मते व आमच्या सपूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणांनुसार, परिच्छेद २(फ), २ (ग), २ (ह), २(आय) आणि २ (जे) मधील टिपणीचा अपवाद करता ताळेबंद, नफा व तोटा पत्रक आणि रोख रकमेचा तपशील, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये आवश्यक असलेली माहिती आवश्यक त्या रीतीने दिली आहे आणि भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या लेखांकन तत्वांना अनुसरुन सत्य व रास्त विचार मांडलेले आहेत.

(१) ताळेबंदाच्या बाबतीत, दिनांक ३१ मार्च २०११ रोजी असल्याप्रमाणे कंपनीच्या कामकाजाची स्थिती.

(२) नफा व तोटयाच्या हिशेबाबत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचा तोटा हा राज्य शासनाकडून देय असलेल्या शासनाच्या २५/९/२००३ च्या अनुदानासोबत जुळत आहे.

(३) रोख रकमेच्या विवरणपत्राच्या बाबतीत, त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाची रोख रक्कम.

सनदी लेखापाल
भुचर आणि चांडक यांचेकरीता,
फर्म नोंदणी क्र. १०१४३९डब्ल्यु

( व्ही. राजगोपाल)
भागीदार
एम क्र. २७३१८

ठाणे
१ जुलै, २०१५

## लेखापरीक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र

महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित यांच्या सदस्यांना, दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी संपणाऱ्या लेखांसाठी आमच्या अहवालाच्या परिच्छेद ३ मध्ये उल्लेखिलेल्या मुद्दयांचे विवरणपत्र

(१)(अ) कंपनीने योग्यरित्या रेकॉर्ड जतन केलेला असून त्यात संख्यात्मक तपशील आणि स्थावर मालमत्तेची स्थितीसह संपूर्ण माहिती तपशीलवार नमूद केलेली आहे.

(ब) आम्हाला असे सांगण्यात आले की वर्षाच्या अखेरीस सर्व स्थावर मालमत्तेची प्रत्यक्ष पहाणी व्यवस्थापनाकडून केली जाते आणि वर्षभरात केलेल्या पडताळणीत मालमत्तेसंबंधी कोणतीही तफावत दिसून आलेली नाही. आमच्या मते, कंपनीचा आकार आणि मालमत्तेचे स्वरुप पाहता तपासणी करण्याचे प्रमाण किफायतशीर आहे.

(क) वर्षभरात कंपनीने स्थावर मालमत्तेचा कोणताही हिस्सा विकलेला नाही.

(२) कंपनीच्या कार्याचे स्वरुप पाहता कोणत्याही प्रकारचा शिल्लक साठा ठेवण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे आदेशाचे कलम ४(२) अहवाल वर्षासाठी कंपनीस लागू ठरत नाही.

(३) कंपनीने कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ३०१ नुसार रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे आदेशाच्या कलम ४(३) प्रमाणे आम्ही कोणताही खुलासा करु शकत नाही.

(४) अहवाल वर्षामध्ये कंपनीने कोणतीही स्थिर मत्ता खरेदी केलेली नाही, कोणत्याही प्रकारची मालमत्ता विकलेली नाही आणि वस्तु सूचि ठेवलेली नाही. परंतु आमच्या लेखापरिक्षणाच्या महत्वाचा मुद्दा क्र. २(फ) आणि २(ग) प्रमाणे आमच्या मते कंपनीने स्वतःची अंतर्गत तपासणीच्या पध्दतीमध्ये सुधारणा आणण्याची गरज आहे.

(५) कंपनीने कलम ३०१ नुसार रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे आदेशाच्या कलम ४(V) प्रमाणे आम्ही कोणताही खुलासा करु शकत नाही.

(६) अहवाल वर्षात कंपनीने जनतेकडून कुठल्याही प्रकारच्या ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. सुरक्षित कर्जरोखे हे कंपनीने आधीच्या वर्षांमध्ये वितरीत केलेले आहेत. आम्ही नोंद घेत आहोत की भारतीय रिझर्व्ह बँकेकडे कंपनीची नोंदणी ठेवी न स्वीकारणारी अधिकोषणेतर (नॉन बँकींग) वित्तीय कंपनी म्हणून नोंद झालेली आहे.

(७) कंपनीमध्ये अंतर्गत लेखापरिक्षणाची कोणतीही व्यवस्था नाही.

(८) आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार केंद्र सरकारने कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९(१)(ड) अन्वये खर्चाची नोंद ठेवण्याची निश्चित पध्दत घालून दिलेली नाही.

(९)(अ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही तपासलेल्या कंपनीच्या कागदपत्रांनुसार कंपनी सर्व वैधानिक देणी ज्यामध्ये भविष्य निर्वाह निधी, शैक्षणिक फंड, कामगार राज्य विमा योजना, प्राप्तीकर, विक्रीकर, मालमत्ता कर, सेवा कर, जकात, अबकारी कर अशा प्रकारच्या वैधानिक देणींचा समावेश आहे, ती सर्व देणी नियमितपणे सक्षम प्राधिकरणाकडे जमा करीत आहे.

पुढे असे नमूद करीत आहे की केंद्र सरकारने आज पर्यंत उपकराची रक्कम, कंपनी अधिनियम कलम ४४१ अ नुसार देय रक्कम, निश्चित केलेली नसल्यामुळे आम्ही याबाबतीत कोणताही अभिप्राय देऊ शकत नाही.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार ३१ मार्च २०११ पर्यंत प्राप्तिकर, विक्रीकर, सेवाकर, जकात आणि अबकारी कर याबाबतीत कोणत्याही वादातीत देयाची थकबाकी अंतिम तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा अधिक राहिलेली नाही.

(१०) महाराष्ट्र राज्य शासनाच्या दिनांक २५.९.२००३ च्या आदेशाप्रमाणे कंपनीच्या लेखयामध्ये राज्य शासनाकडून येणे बाकी या सदराखाली उत्पन्नापेक्षा जास्त झालेल्या खर्चाइतकी रक्कम दाखविलेली आहे. या रकमेमध्ये कंपनीचा कुठलाही संचित तोटा नाही. हे गृहीत धरता, अहवाल वर्षात किंवा त्याच्या मागील वर्षात कंपनीला रोख तोटा झालेला नाही.

(११) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने वित्तीय संस्था, बँक अथवा परिवर्तनीये रोखेधारक यांना देय असलेली कुठलीही थकबाकी नाही.

(१२) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने समभाग, परिवर्तनीय रोखे किंवा अशा तऱ्हेचे तारणपत्रे तारण ठेऊन कुठल्याही प्रकारची कर्जे अथवा अग्रिमे दिलेली नाहीत.

(१३) कंपनी चिट फंड, म्युच्युअल बेनीफिट फंड किंवा सोसायटी नाही, त्यामुहे आदेशाचे कलम ४(१३) कंपनी आदेश (लेखा परिक्षण अहवाल) कंपनीस लागू होत नाही.

(१४) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी समभाग, परिवर्तनीय रोखे, तारणपत्रे किंवा अशा प्रकारच्या गुंतवणूकीमध्ये व्यवहार करत नाही. त्यामुळे कलम ४(१४) कंपनी आदेश (लेखपरिक्षण अहवाल), २००३ कंपनीस लागू होत नाही.

(१५) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कर्जे घेण्यासाठी कोणालाही हमी दिलेली नाही. त्यामुळे कलम ४(१५) कंपनी आदेश (लेखपरिक्षण अहवाल), २००३ कंपनीस लागू होत नाही.

(१६) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने अहवाल वर्षात कुठल्याही प्रकारचे मुदतीची कर्जे घेतलेली नाहीत.

(१७) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीने आणि आम्ही केलेल्या ताळेबंदाच्या परिक्षणानुसार कंपनीने दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी कुठल्याही प्रकारची अल्प मुदतीची वित्तीय उभारणी केलेली नाही.

(१८) अहवाल वर्षात कंपनीने कुठल्याही प्रकारचे समभाग वितरीत केलेले नाहीत. त्यामुळे कलम ४(१८) कंपनी आदेश (लेखपरिक्षण अहवाल), २००३ कंपनीस लागू होत नाही.

(१९) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही तपासलेल्या कंपनीच्या लेखा पुस्तकांनुसार कंपनीने अहवाल वर्षात कुठल्याही प्रकारचे परिवर्तनीय रोखे वितरीत केले नाहीत.

(२०) अहवाल वर्षात कंपनीने कुठल्याही प्रकारचे पब्लिक इश्यूज काढलेले नाहीत. त्यामुळे कलम ४(२०) कंपनी आदेश (लेखपरिक्षण अहवाल), २००३ कंपनीस लागू होत नाही.

(२१) आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार कंपनीकडून वा कंपनीबाबत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार वर्षभरात झालेला नाही.

सनदी लेखापाल
भुचर आणि चांडक यांचेकरीता,
फर्म नोंदणी क्र. १०१४३९डब्ल्यु

( व्ही. राजगोपाल)
भागीदार
एम क्र. २७३१८

ठाणे
१ जुलै, २०१५

# महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित
## (पूर्वीचे नांव होरायझन फिस्कल्स प्रायव्हेट लिमिटेड)
## दिनांक ३१ मार्च २०११ रोजीची ताळेबंद

| तपशील | अनुसूची क्रमांक | ३१ मार्च २०११ रोजी असल्याप्रमाणे रुपये | रुपये | ३१ मार्च २०१० रोजी असल्याप्रमाणे रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| निधीची साधने | | | | | |
| १. समभागधारकांचा निधी | | | | | |
| अ) भांडवल | १ | ५६०,००० | | ५६०,००० | |
| ब) राखीव निधी व शिल्लक | २ | ९,३९७,२३५ | ९,९५७,२३५ | ९,३९७,२३५ | ९,९५७,२३५ |
| २. कर्ज निधी | | | | | |
| अ) सुरक्षित कर्जे | ३ | ६,९०१,३००,००० | | ६,९९१,७००,००० | |
| ब) असुरक्षित कर्जे | ३ | निरंक | ६,९०१,३००,००० | निरंक | ६,९९१,७००,००० |
| | | | ६,९११,२५७,२३५ | | ७,००१,६५७,२३५ |
| निधीचे उपयोजन | | | | | |
| १. स्थिर मत्ता | ४ | १,२४८,६३३ | १,२४८,६३३ | १,३१४,३५१ | १,३१४,३५१ |
| २. चालू मत्ता, कर्जे आणि अग्रिमे: | | | | | |
| रोख व बँकेतील शिल्लक | ५ | १,१०९,१५३ | | ५,५५५,२४४ | |
| अन्य चालू मत्ता | ६ | ६४८,८१७,४२० | | ७३२,५७८,८९८ | |
| कर्जे व अग्रिमे | ७ | ६,९०२,६८४,८४९ | | ६,९९३,०८४,८५० | |
| | | ७५५२,६११,४२२ | | ७,७३१,२१८,९९२ | |
| वजा: चालू दायित्वे आणि तरतूदी: | | | | | |
| चालू दायित्वे | ८ | ६४२,६०२,८२० | | ७३०,८७६,१०८ | |
| तरतूदी | ९ | ० | | ० | |
| | | ६४२,६०२,८२० | ६,९१०,००८,६०२ | ७३०,८७६,१०८ | ७,०००,३४२,८८४ |
| | | | ६,९११,२५७,२३५ | | ७,००१,६५७,२३५ |
| लेखांवरील टिपण्या | १३ | | | | |

संचालक मंडळाकरीता व त्यांच्या वतीने,

संचालक संचालक

आजपर्यंतच्या अहवालानुसार
भुचर आणि चांडक
सनदी लेखापाल यांचे करीता
फर्म रजिस्टर क्र. १०१४३९डब्ल्यु

( व्ही. राजागोपाल )
भागीदार
एम क्र. २७३१८

ठिकाण – मुंबई
दिनांक – २२ जुलै, २०१३

## महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित
## (पूर्वीचे नांव होरायझन फिस्कल्स प्रायव्हेट लिमिटेड)
## दिनांक ३१ मार्च २०११ रोजीचे नफा-तोटा पत्रक

| तपशील | अनुसूची क्रमांक | ३१ मार्च २०११रोजी असल्याप्रमाणे रुपये | ३१ मार्च २०१० रोजी असल्याप्रमाणे रुपये |
|---|---|---|---|
| उत्पन्न : | | | |
| १. पाटबंधारे महामंडळांच्या कर्जावरील व्याज | | ६८०,९८८,८५७ | ६८६,८७३,३५९ |
| इतर व्याज | १० | ५०२,४३३ | १,९२३,२३० |
| महाराष्ट्र शासनाकडून मिळालेला उत्पन्न आणि खर्च यामधील फरक | | १२३,००४,७४५ | १६८,९४५,८६३ |
| प्राप्तिकर परताव्यावरील व्याज | | १,५०० | ३१,७८५ |
| | | ८०४,४९७,५३५ | ८५७,७७४,२३७ |
| खर्च : | | | |
| वित्तीय खर्च | ११ | ८०२,८९१,०७७ | ८५६,११३,७२१ |
| प्रशासकीय व इतर खर्च | १२ | १,५४०,७४० | १,५९१,३४० |
| घसारा | | ६५,७१८ | ६९,१७६ |
| | | ८०४,४९७,५३५ | ८५७,७७४,२३७ |
| करपूर्व नफा | | -- | -- |
| वजा : करासाठी तरतूद | | | |
| चालू कर | | -- | -- |
| स्थगित कर | | -- | -- |
| करोत्तर निव्वळ नफा | | -- | -- |
| अधिक : अगोदरच्या वर्षातील शिल्लक नफा/तोटा | | (५४,७६५) | (३१,७८७) |
| पूर्वीच्या वर्षातील तरतूदी | | -- | २२,९७८ |
| ताळेबंदाकरीता निव्वळ नफा/तोटा | | (५४,७६५) | (५४,७६५) |
| प्रति समभाग मिळकत (मूळ आणि सौम्य) पूर्ण भरणा केलेला प्रत्येक समभाग मूल्य रु.१०/- | | -- | -- |
| लेखांवरील टिपण्या | १३ | | |

संचालक मंडळाकरीता व त्यांच्या वतीने,

संचालक संचालक

आमच्या अहवाल दिनांकानुसार
भुचर आणि चांडक
सनदी लेखापाल यांचे करीता
फर्म नोंदणी क्र. १०१४३९डब्ल्यु

व्ही. राजागोपाल
भागीदार
एम क्र. २७३१८

मुंबई
२२ जुलै, २०१५

## महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित
## (पूर्वीचे नांव होरायझन फिस्कल्स प्रायव्हेट लिमिटेड)
## लेरव्यांवरील अनुसूची दिनांक ३१ मार्च २०११ करीता

| तपशील | ३१ मार्च २०११रोजी असल्याप्रमाणे रुपये | ३१ मार्च २०१० रोजी असल्याप्रमाणे रुपये |
|---|---|---|
| **अनुसूची क्रमांक १** | | |
| **भागभांडवल** | | |
| प्राधिकृत | | |
| प्रत्येक रु.१०/- चे २०,००,००० सममूल्य भाग २०,०००,००० | २०,०००,००० | |
| (मागील वर्षी — प्रत्येक रु.१०/- चे २०,००,००० सममूल्य भाग | | |
| <u>अभिदत्त विक्रीस काढलेले आणि भरणा केलेले</u> | | |
| पूर्णत: भरणा केलेले प्रत्येकी रु.१०/- चे ५६,००० सममूल्य भाग | ५६०,००० | ५६०,००० |
| (मागील वर्षी पूर्णत: भरणा केलेले प्रत्येकी रु.१०/- चे ५६,००० सममूल्य भाग) | | |
| वरीलपैकी ४४,८०० सममूल्य भाग हे भाग अधिमूल्य लेरव्यांचे भांडवलीकरण करुन बोनस सममूल्य भाग म्हणून वाटप करण्यात आले आहेत. | | |
| | | |
| **अनुसूची क्रमांक २** | | |
| **राखीव आणि अतिरीक्त निधी** | | |
| नफा तोटयाचा हिशेब | ५४,७६५ | ५४,७६५ |
| समभाग अधिमूल्य | ९,४५२,००० | ९,४५२,००० |
| | ९,३९७,२३५ | ९,३९७,२३५ |
| | | |
| अनुसूची क्रमांक ३ | | |
| प्रतिभूती कर्जे | | |
| रोरवे मालिका १ | १,३४४,८००,००० | १,४२९,९००,००० |
| रोरवे मालिका २ | ६१,५००,००० | ६६,८००,००० |
| रोरवे मालिका ३ | ४,९९०,०००,००० | ४,९९०,०००,००० |
| रोरवे मालिका ४ | ४०५,०००,००० | ४०५,०००,००० |
| | ६,९०१,३००,००० | ६,९९१,७००,००० |

टिप : हे रोरव्यांकरीता कार्यालयीन जागा व महाराष्ट्र शासनाकडून मिळणारा निधी तारण आहे (सिक्युरिटीची निर्मिती करताना) त्याचा पहिला हक्क राहील.

| | | |
|---|---|---|
| **अनुसूची क्रमांक ४** | | |
| **स्थिर मत्ता** | | |
| कार्यालयीन जागा | | |
| प्रारंभीची शिल्लक | १,८७९,९३१ | १,८७९,९३१ |
| अधिक : वर्षभरात केलेली खरेदी | -- | -- |
| एकूण | १,८७९,९३१ | १,८७९,९३१ |
| वजा : संचित घसारा | | |
| प्रारंभीची शिल्लक | ५६५,५८० | ४९६,४०४ |
| अधिक : वर्षातील घसारा | ६५,७१८ | ६९,१७६ |
| अखेरची शिल्लक | ६३१,२९८ | ५६५,५८० |
| निव्वळ शिल्लक | १,२४८,६३३ | १,३१४,३५१ |

**अनुसूची क्रमांक ५**

**रोख रक्कम व बँकेतील शिल्लक**

| | | |
|---|---|---|
| शेडयुल्ड बँकांतील चालू खात्यातील शिल्लक | | |
| सीबीआय खाते क्र. ४८५८ | १,०५९,५३३ | १,०५९,५३३ |
| सीबीआय खाते क्र. २६४२ | ३१,२१४ | ३१,२१४ |
| सीबीआय खाते क्र. ८३२६ | ७,१२० | ७,१२० |
| एचडीएफसी बँक मधील चालू खाते | ११,२८६ | ४,४५७,३७८ |
| | १,१०९,१५३ | ५,५५५,२४४ |

**अनुसूची क्रमांक ६**

**चालू मत्ता :-**

| | | |
|---|---|---|
| पाटबंधारे महामंडळांच्या कर्जावरी व्याज | | |
| कोकण पाटबंधारे विकास महामंडळ | १३,११२,६०२ | १३,११२,६०२ |
| गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ | १४९,१४४,२४३ | १४९,१४४,२४३ |
| तापी पाटबंधारे विकास महामंडळ | १२,८४४,६७५ | १२,८४४,६७५ |
| महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ | ४२,८५२,५२९ | ४२,८५२,५२९ |
| विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ | २७८,०५८,६९९ | २७८,०५८,६९९ |
| सिकॉमकडील ठेव प्रमाणपत्र | ११,३२२,८८३ | ६८,४५७,५३६ |
| सिकॉमकडील ठेव प्रमाणपत्रावर मिळालेले व्याज | ४४५,६६३ | ४१३,२२१ |
| अग्रधन व्यवसाय कर | ६,००० | ८,००० |
| अग्रधन रेटींग फी | १,३९१,५७३ | -- |
| राज्यशासनाकडून येणे | १३९,६३८,५५४ | १६७,६८७,३९४ |
| | ६४८,८१७,४२० | ७३२,५७८,८९८ |

**अनुसूची क्रमांक ७**

**कर्जे व अग्रिमे**

| | | |
|---|---|---|
| विविध पाटबंधारे महामंडळांना दिलेले कर्जे | | |
| कोकण पाटबंधारे विकास महामंडळ | १५०,३६४,३८२ | १५६,४७१,०९५ |
| गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ | २,०६३,१७८,९७३ | २,०८६,१३९,२८७ |
| तापी पाटबंधारे विकास महामंडळ | १४६,७५४,५८० | १५२,८०९,९६७ |
| महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ | ६२२,७५३,६२८ | ६४४,४२४,४६१ |
| विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ | ३,९१७,२०१,१३७ | ३,९५०,८०७,८८९ |
| रोखीने किंवा अन्य प्रकारे मिळणरी अग्रिमे | | |
| टीडीएस निर्धारण आर्थिक वर्ष २००३-०४ करीता | २९५,५०८ | २९५,५०८ |
| टीडीएस निर्धारण आर्थिक वर्ष २००४-०५ करीता | २,१२०,६६६ | २,१२०,६६६ |
| टीडीएस निर्धारण आर्थिक वर्ष २००५-०६ करीता | ६,६६४ | ६,६६४ |
| टीडीएस निर्धारण आर्थिक वर्ष २००७-०८ करीता | ९,३१३ | ९,३१३ |
| | ६,९०२,६८४,८४९ | ६,९९३,०८४,८५० |

**अनुसूची क्रमांक ८**

**चालू दायित्वे**

| | | |
|---|---|---|
| सिकॉम मर्यादित | ६,२७१,७०४ | ५,२७९,००४ |
| अदत्त लेखा परिक्षण शुल्क | ३६,२६० | २७,८३३ |
| अदत्त कर लेखा परिक्षण शुल्क | ११,०३० | ११,०३० |
| अदत्त व्यवसाय कर | ४७,३५३ | ५०,१४७ |
| अदत्त ट्रस्टी शुल्क | १,८९७,५७८ | ९६५,९०३ |

| | | |
|---|---|---|
| अदत्त रेटींग शुल्क | १५०,३९४ | -- |
| अदत्त पालिका कर | २६,१५९ | -- |
| महाराष्ट्र शासनाला देय असलेली हमी रक्कम | ११६,४०६,००० | १६५,७८१,००० |
| कर्जरोरव्यांवरील संचित व्याज | | |
| रोरवे मालिका १ | १३५,४९५,५६३ | १४३,६४४,६९१ |
| रोरवे मालिका २ | ५,०१८,५६८ | ५,४४१,६६१ |
| रोरवे मालिका ३ | ३३६,६१५,४७९ | ३३६,६१५,४७९ |
| रोरवे मालिका ४ | २९,०११,५४८ | २९,०११,५४८ |
| मुदतपूर्ण होऊन रक्कम परत न केलेले रोरवे | | |
| रोरवे मालिका १ | ६,२२३,८०८ | २९,३००,००० |
| रोरवे मालिका २ | ३,०००,००० | १०,८००,००० |
| मुदतपूर्ण झालेल्या रोरव्यांवरील व्याज | | |
| रोरवे मालिका १ | १,८३८,५६३ | २,९६७,४५२ |
| रोरवे मालिका २ | २४३,६७८ | ६०५,५६९ |
| स्त्रोताच्या ठिकाणी कापलेला अदत्त कर | ३०९,१३४ | ३७४,७९१ |
| | ६४२,६०२,८२० | ७३०,८७६,१०८ |

**अनुसूची क्रमांक ९**

| | | |
|---|---|---|
| तरतुदी | -- | -- |

**अनुसूची क्रमांक १०**

**व्याज — इतर**

| | | |
|---|---|---|
| ठेव प्रमाणपत्रावरील | ५०२,४३३ | १,९२३,२३० |
| | ५०२,४३३ | १,९२३,२३० |

**अनुसूची क्रमांक ११**

**वित्तीय रवर्च**

| | | |
|---|---|---|
| रोरवे मालिका १ वरील व्याज | १६०,१४३,५९३ | १६४,०५८,७३६ |
| रोरवे मालिका २ वरील व्याज | ७,४९५,५९२ | ७,६६८,७५० |
| रोरवे मालिका ३ वरील व्याज | ४७४,०५०,००० | ४७४,०८९,०४१ |
| रोरवे मालिका ४ वरील व्याज | ४०,८८५,००० | ४०,८८५,००० |
| इतर व्याज | २,००१ | ६,८१७ |
| हमी फी | ११६,४०६,००० | १६५,७८१,००० |
| लिस्टींग फी | १५५,५२३ | १७२,८४० |
| रेटींग फी | २,७१८,१७३ | २,२९४,७५९ |
| ट्रस्टीशिप फी | १,०३५,१९५ | १,१५६,७७८ |
| | ८०२,८९१,०७७ | ८५६,११३,७२१ |

**अनुसूची क्रमांक १२**

**प्रशासकीय व इतर रवर्च**

| | | |
|---|---|---|
| बँक आकार | २,५९२ | ४,२१७ |
| वार्षिक कस्टोडियल रवर्च | ११३,६०९ | १९५,४१३ |
| पालिका कर | २६,१५९ | २६,१५९ |
| कंपनी निबंधकांची फी | ४१,९०० | -- |
| छपाई आणि स्टेशनरी | २५,७६६ | १०,१६४ |
| व्यवसाय कर | २,००० | २,००० |

| | | |
|---|---|---|
| लेखापरिक्षण शुल्क | २२,४७२ | १३,७८८ |
| कर लेखापरिक्षण शुल्क | ११,०३० | ११,०३० |
| व्यवस्थापन शुल्क | १,१०३,००० | १,१०३,००० |
| व्यावसायीक शुल्क | १९२,१६५ | २२५,८३४ |
| संकीर्ण खर्च | ४७ | २६५ |
| | १,५४०,७४० | १,५९१,३४० |

# महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित
## (पूर्वीचे नांव होरायझन फिस्कल्स प्रायव्हेट लिमिटेड)

अनुसूची १३

दिनांक ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी लेरव्यांना जोडलेल्या व लेरव्यांचा भाग असलेल्या टिपा :

१. लेरव्यांची धोरणे :

अ) लेरवे वाणिज्यिक पध्दतीने ठेवलेले आहेत

ब) महसुलाला मान्यता — महसुली उत्पन्न व मूल्य/ रवर्च हे सर्वसाधारणपणे जसे मिळविलेले असेल किंवा रवर्च केलेले असेल त्या पध्दतीनेच हिशेबात घेतले जातात.

क) कराधान — चालू तसेच स्थ।।गित कराधान या दोहोंसाठी आवश्यक त्या मर्यादिपर्यंत तरतूद केली आहे.

ड) स्थावर मालमत्ता — मालमत्ता ताब्यात घेताना असलेल्या किमतीप्रमाणे स्थावर मालमत्ता दर्शविण्यात आली आहे. सर्व स्थावर मालमत्तांचे मूल्य, मूळ किंमत वजा घसारा असे दर्शविण्यात आले आहे.

इ) घसारा — सर्व स्थावर मालमत्तेवर कंपनी कायदा, १९५६ नुसार 'कमी होणाऱ्या मूल्याप्रमाणे' घसारा काढण्यात आला आहे.

फ) आर्थिक वर्षात राज्य शासनाकडून मिळणारी रक्कम ही रवर्च केल्यानुसार मिळाणार असते. अशी रक्कम ज्या वर्षात मिळावयाची होती त्या वर्षात नफा तोटा पत्रकामध्ये ती मिळकत या सदरारवाली नोंदली आहे.

२. महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय ही कंपनी संपूर्णपणे महाराष्ट्र शासन व त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींच्या मालकीची आहे. या कंपनीवर कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र कृष्णा रवोरे पाटबंधारे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ या पाच पाटबंधारे महामंडळांसाठी निधी उभारण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या प्रयोजनासाठी केलेल्या सर्व विद्यमान व भविष्यातील दायित्वांचे प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने बिनशर्त व रद्द न करता येण्याजोगी हमी दिलेली आहे.

अ) कंपनीने रोरवे विक्रीस काढून उभारलेला निधी या पाच पाटबंधारे महामंडळांना कर्जरुपाने देण्यात आला आहे. पाटबंधारे महामंडळांना आगाऊ दिलेल्या रकमांसाठी अटी व शर्ती निविष्ट करणारा कंपनी, पाटबंधारे महामंडळे व महाराष्ट्र शासन यांच्यामधील बहुपक्षीय करार अंमलात येण्याच्या प्रक्रियेत आहे. उक्त करार अमलात येईपर्यंत कंपनीने ज्या अटींवर निधी उभारलेला आहे त्याच अटींवर सदर निधी पाटबंधारे महामंडळांना कर्ज रुपाने देण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला आहे. अनुसची १३ च्या टिप क्र. २(अ) नुसार सदर कराराच्या अनुपस्थितीत आगाऊ रकमांवर मिळणाऱ्या व्याजाची रक्कम त्या त्या वेळी असलेल्या सरासरी दराने निश्चित करता येणार नाही.

ब) ट्रस्टी, कंपनी आणि महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या करारानुसार रोरवेधारकांना मुद्दल आणि व्याजापोटी द्यावयाची रक्कम विशिष्ट तारखांना देण्याची हमी महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे. ही रक्कम ज्यावेळी महाराष्ट्र शासनाकडून मिळेल, त्यावेळी पाटबंधारे महामंडळांकडून व्याज आणि मुद्दलाची रक्कम कंपनीस देणे असल्यास रवाती जमा केली जाईल.

३. घटनापेक्ष दायित्वे – निरंक

४. कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची सहाच्या भाग दोनच्या परिच्छेद ३, ४सी आणि ४ डी अनुसार जादा महिती — लागू नाही.

५. लघु, लघुत्तम आणि मध्यम उद्योग घटकांना देय रक्कम — रुपये निरंक

६. दरमहा रु. २,००,००० हून अधिक पारिश्रमिक ।।ळालेल्या कर्मचाऱ्यांची संरव्या – निरंक

७. व्याज, लाभांश इत्यादींपोटी विदेशी चलनात परकीय देशांकडे भरणा केलेली रक्कम – निरंक

८. विदेशी चलनातील मिळकत – निरंक

९. प्रत्येकी रु. १० च्या ५६,००० समभागांनी करारानंतर निव्वळ नफ्याला भागून प्रती भागाच्या मूळ मिळकतीची संगणना केली आहे. सौम्य उपलब्ध्द समभाग नसल्यामुळे प्रती भाग सौम्य मिळकत ही प्रती भाग मूळ मिळकतीप्रमाणे आहे.

१०. कंपनी ही महाराष्ट्र शासनाने, रोरव्यांद्वारे निधी उभारुन पाटबंधारे महामंडळांना कर्जरुपाने वित्तीय पुरवठा करणे या विशिष्ट उद्देशाने स्थापन केली असल्यामुळे कंपनी बिगर व्यवसाय संस्था आहे. पुस्तकी नफा व कर नफा यांच्या वेळेतील फरकामुळे प्रलंबित कर दायित्व वर्षभरात निर्माण झालेले आहे. कंपनी ही विशिष्ट उद्देशाने स्थापन झालेली असल्यामुळे भविष्यात नफा मिळण्याची शक्यता नाही, परिणामी प्रलंबित कर दायित्वाची निश्चिती करण्याची आवश्यकता नाही.

११.	कंपनी एकाच भौगोलिक क्षेत्रात पाटबंधारे महामंडळांना अर्थसहाय्य करणे या एकाच कार्यक्षेत्रात कार्य करते त्यामुळे स्वतंत्र विभागवार माहिती नमूद करण्याची आवश्यकता नाही.

१२.	ही कपंनी शासनाच्या मालकीची असल्यामुळे या कंपनीला संबंधित पक्षाची माहिती लेखांकन मानक १८ अन्वये इतर राज्य नियंत्रित संस्थांबरोबरचे संबध व व्यवहार याबद्दल आवश्यक असलेल्या माहितीतून सूट दिलेली आहे.

१३.	कर्जरोख्यांच्या (मालिका १ ते ४) समावेश असलेल्या सुरक्षित कर्जांना महाराष्ट्र शासनाने हमी दिलेली आहे. त्याबरोबर कंपनीच्या आवारात ठेवण्यात आलेल्या गहाणाचा तसेच कंपनीस मिळणारा तारण आकार यासही सरकारची हमी आहे.

१४.	संचित तोटयामुळे प्राप्तिकराची तरतूद करण्यात आलेली नाही. सातत्याने तोटा संचित होत असल्यामुळे किमान कराची तरतूद हिशेबात करण्यात आलेली नाही.

१५.	कर्जरोख्यांची (मालिका १ आणि २) मुदत पूर्ण झालेली आहे, परंतु त्यांची फेड (रु. ०.९२ कोटी) केलेली नाही तसेच या रोख्यांवरील व्याज (रु. ०.२१ कोटी) दिलेले नाही. परंतु अल्पावधित ही रक्कम देण्यात येणार आहे, ती सर्व 'चालू दायित्वे' या मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

१६.	चालू वर्षाचा हिशेब दाखविण्यासाठी मागील वर्षाची आकडेवारीचे जेथे आवश्यक होते तेथे पुनर्गटवारी, पुनर्बांधणी व पुनर्वर्गीकरण केले आहे.

अनुसूची १ ते १३ साठी स्वाक्षऱ्या

संचालक मंडळाकरीता व त्यांच्या वतीने,

आमच्या अहवाल दिनांकानुसार
भुचर आणि चांडक
सनदी लेखापाल यांचे करीता
फर्म रजिस्टर क्र. १०१४३९डब्ल्यु

संचालक		संचालक

व्ही. राजागोपाल
भागीदार
एम क्र. २७३१८

मुंबई
१ जुलै, २०१५

| | | |
|---|---|---|
| क) | अनुसूची सहाच्या भाग चार नुसार जादा माहिती : | |
| १. | नोदणीचा तपशील | |
| | नोंदणी क्रमांक | राज्य सांकेतांक |
| | ११–१०२२७३ | ११ |
| | ताळेबंदाचा दिनांक : ३१/०३/२०११ | |
| २. | वर्षभरात उभारलेले भांडवल (रुपये हजारात) : | |
| | सार्वजनिक रोखे | हक्क विक्री |
| | निरंक | निरंक |
| | बोनस रोखे | खाजगी गुंतवणूक |
| | निरंक | निरंक |
| ३. | निधीचे उपयोजन (रुपये हजारात) : | |
| | एकूण दायित्वे | एकूण मत्ता |
| | ६९,११,२५७,२३५ | ६९,११,२५७,२३५ |
| | निधीची साधने | राखीव निधी व शिल्लक |
| | भरणा झालेले भांडवल | |
| | ५६० | ९,३९७ |
| | प्रतिभूत कर्जे | अप्रतिभूत कर्जे |
| | ६९,०१,३०० | निरंक |
| | फंडाचा विनियोग | |
| | निव्वळ स्थावर मत्ता | गुंतवणूक |
| | १,२४८ | निरंक |
| | निव्वळ चालू मत्ता | संकीर्ण खर्च |
| | ६९,१०,००८,६०१ | निरंक |
| ४. | कंपनीची कामगिरी (रुपये हजारात) : | |
| | उत्पन्न | एकूण खर्च |
| | १५,४८,०८२,८२१ | १५,४८,०८२,८२१ |
| | + – नफा/तोटा | + – नफा/तोटा |
| | करपूर्व | करपश्चात |
| | निरंक | – |
| | प्रतिभाग मिळकत रुपयात | लाभांश दर % |
| | निरंक | निरंक |
| ५. | कंपनीच्या तीन मुख्य उत्पादनांची/ सेवांची सामान्य नावे (वित्तीय अटींनुसार) | |
| | सांकेतांक क्र. | |
| | (आयटीसी सांकेतांक) | लागू नाही |
| | उत्पादनाचे वर्णन | पाटबंधारे प्रकल्पांना अंशत: वित्त पुरवठा करण्यासाठी निधी उभारणे |
| | सांकेतांक क्र. | |
| | (आयटीसी सांकेतांक) | लागू नाही |
| | उत्पादनाचे वर्णन | लागू नाही |

अनुसूची १ ते १३ साठी स्वाक्षऱ्या
संचालक मंडळाकरीता व त्यांच्या वतीने,

संचालक संचालक
मुंबई १ जुलै, २०१५

**महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कपनी मर्यादित**

रोख रकमेचे विवरणपत्र

| | | २०१०-११ | २००९-१० |
|---|---|---|---|
| अ) प्रचालात्मकउपक्रमातून मिळालेली रोख रक्कम : | | | |
| करपूर्व नफा | | - | - |
| अधिक : | | | |
| घसारा | | ६५,७१८ | ६९,१७६ |
| व्याज खर्च | | - | - |
| निर्लेखित केलेला प्रारंभिक खर्च | | - | - |
| खेळत्या भांडवलात बदल करण्यापूर्वीचा प्रचालनात्मक नफा | | ६५,७१८ | ६९,१७६ |
| वजा : | | | |
| चालूमत्तांमधील घट | ९०,४००,००० | | |
| इतर चालू दायित्वे | ८८,२७३,२८८ | १७८,६७३,२८८ | १६२,५५१,८५६ |
| कर्ज व अग्रिमे यामध्ये वाढ | | (९०,४००,००१) | (१०,११३,१०१) |
| अधिक : | | | |
| चालू मत्तेमध्ये घट | | | |
| चालू मत्ता | ८३,७६१,४७८ | | १५२,३६९,८६२ |
| पूर्वीची कर दायित्वे | | | |
| (चालूमत्तेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहेत) | | ८३,७६१,४७८ | |
| भरलेला कर | | | |
| मिळालेली रोख रक्कम | | (४,४४६,०९२) | २८३ |
| अतिरिक्त प्रकरणांपूर्वीचे रोख रकमेचे विवरण | | (४,४४६,०९२) | २८३ |
| अतिरिक्त प्रकरणे | | - | - |
| प्रचालनातील निव्वळ रोख रक्कम | | (४,४४६,०९२) | २८३ |
| ब) गुंतवणूक उपक्रमांद्वारे रोख रक्कम | | | |
| वजा : स्थावर मत्तेत भर | | - | - |
| गुंतवणूक उपक्रमांद्वारे निव्वळ रोख रक्कम | | - | - |
| क) वित्तीय उपक्रमाद्वारे रोख रक्कम | | | |
| वित्तीय उपक्रमाद्वारे निव्वळ रोख रक्कम | | - | - |
| रोख आणि सममूल्य रोख रक्कम यामधील नक्त वाट (अ + ब + क) | | (४,४४६,०९२) | २८३ |
| वर्षारंभी रोख आणि सममूल्य रोख रक्कम | | ५,५५५,२४४ | ५,५५४,९६३ |
| वर्षाअखेर रोख आणि सममूल्य रोख रक्कम | | १,१०९,१५३ | ५,५५५,२४४ |
| निव्वळ वाढ/(घट) वर जाहीर केल्याप्रमाणे | | (४,४४६,०८८) | २८३ |

संचालक मंडळाकरीता व त्यांच्या वतीने,

आमच्या अहवाल दिनांकानुसार
भुचर आणि चांडक
सनदी लेखापाल यांचे करीता
फर्म रजिस्टर क्र. १०१४३९डब्ल्यु

संचालक संचालक

व्ही. राजागोपाल
भागीदार
एम क्र. २७३१८

मुंबई
१ जुलै, २०१५

मुरव्य महालेरवापाल (लेरवा परिक्षण)-३, महाराष्ट्र
प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई ४०० ०२०

गोपनीय

पीएजी/लेप-३/वालेप रवंड-१/पाटबंधारे/२०१०-११/६३०

प्रति,
महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी
मुंबई.

**विषय - महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, मुंबईच्या ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या हिशेबांसंबंधी कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ६१९(४) अन्वये भारतीय नियंत्रक व महालेरवापरीक्षक यांचा अभिप्राय**

दिनांक ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, मुंबईच्या हिशेबांसंबंधी कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ६१९(४) अन्वये भारतीय नियंत्रक व महालेरवापरिक्षक यांचा निरंक (Nil Comments) अभिप्राय सोबत जोडला आहे.

कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाल्यानंतर, वार्षिक अहवालाच्या छापील ५ प्रती या कार्यालयास पाठवाव्यात.

आपली भवदीय,

( संगीता चौरे )
मुरव्य महालेरवाकार

जोडपत्र - वरील प्रमाणे

**महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, मुंबईच्या ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या हिशेबांसंबंधी कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ६१९(४) अन्वये भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अभिप्राय**

महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, मुंबईचे ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे वित्तीय विवरणपत्र कंपनी कायदा, १९५६ अन्वये ठरवून देण्यात आलेल्या चौकटीनुसार तयार करण्याची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापनाची आहे. भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षक, कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ६१९(२) अन्वये सनदी लेखापरीक्षकांची नियुक्ती करतात. हे सनदी लेखापरीक्षक इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाऊन्टंटस ऑफ इंडिया या व्यावसायिक संस्थेने घालून दिलेल्या नियमानुसार व संहितेप्रमाणे वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरीक्षण करुन कंपनी कायदा, १९५६ च्या कलम २२७ अन्वये नि:पक्षपातीपणे अभिप्राय व्यक्त करुन त्या अभिप्रायास जबाबदार राहतात. ही जबाबदारी या सनदी लेखापरीक्षकांनी पार पाडून १ जुलै, २०१५ रोजी लेखापरीक्षणाचा अहवाल सादर केला आहे.

मी, भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या वतीने महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, मुंबईच्या ३१ मार्च २०११ रोजी संपलेलया आर्थिक वर्षाच्या वित्तीय विवरणपत्राचे कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ६१९(३)(बी) अन्वये पूरक लेखापरीक्षण केले आहे. हे पूरक लेखापरीक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले आहे. त्यासाठी सनदी लेखापरीक्षकांच्या कागदपत्रांचा आधार घेण्यात आलेला नाही, हे लेखापरीक्षण सनदी लेखापरीक्षकांनी केलेली चौकशी आणि निवडक हिशेबाच्या नोंदी यांच्यापुरती मर्यादित आहे. माझ्या लेखापरीक्षणानुसार कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ६१९(४) अन्वये, लेखा परिक्षकांच्या अहवालावर, मला कोणतीही टिपणी किंवा पूरक विवरणपत्र देण्याची आवश्यकता वाटत नाही.

भारतीय नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांच्या वतीने आणि त्यांच्यासाठी

मुख्य महालेखापाल
(लेखपरीक्षण-३)

ठिकाण — मुंबई
तारीख –